महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९२ वे | दिनांक : ०६/०७/२०२६ | वार : सोमवार

## संभाजीनगर जिल्हा बँक निवडणुकीत महायुतीचा धनशक्तीने विजय - मतदारांना कंटाळा येईपर्यंत पैसे वाटले; कल्याण काळे



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत महायुतीने २० पैकी १८ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. या विजयावर काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांनी गंभीर आरोप केला आहे. ही निवडणूक 'धनशक्ती'च्या जोरावर जिंकली असून, मतदारांना कंटाळा येईपर्यंत पैसे वाटण्यात आल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

रविवारी सकाळी आठ वाजल्यापासून जिल्हा मध्यवर्ती बँकेत मतमोजणीला सुरुवात झाली. महायुतीने संचालक मंडळ निवडणुकीत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. काँग्रेसला केवळ एक जागा मिळाली, तर उद्धवसेनेलाही एक जागा मिळाली.

निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेच्या बिगर शेती मतदारसंघात काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांनी अभिजीत देशमुख यांचा पराभव केला. काळे यांना ४८ मते मिळाली, तर देशमुख यांना २६ मतांवर समाधान मानावे लागले.

बिगर शेती मतदारसंघातून महायुतीचे अतुल सावे (२६७ मते), अंबादास दानवे (२१०), रामराव (रामूकाका) शेळके (२३७), अर्जुन पाटील (२२३) आणि रवींद्र काळे (१८९) हे पाचही उमेदवार विजयी झाले. इतर मतदारसंघातून आमदार अनुराधा चव्हाण (७४९ मते), मुक्ता तांगडे (६४० मते) आणि सुवर्णा जाधव (५४० मते) यांनीही विजय मिळवला.

खासदार कल्याण काळे यांनी आपल्या आरोपाचा पुनरुच्चार करत म्हटले की, "जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक महायुतीने धनशक्तीच्या जोरावर जिंकली आहे. शेतकऱ्यांच्या या बँकेत मतदारांना मोठ्या प्रमाणात पैसे वाटण्यात आले. लोकांना कंटाळा येईपर्यंत भेटून प्रत्येक भेटीत पैसे दिले गेले. त्यामुळे ही निवडणूक धनशक्तीवर जिंकली गेली."

या आरोपांना ओबीसी विकास मंत्री अतुल सावे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. सावे म्हणाले, "मतदारांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. मग कल्याण काळे यांचा विजय धनशक्तीने झाला का, हे त्यांनी स्पष्ट करावे. लोक आमच्या पाठीशी आहेत."

## वारीत अत्यावश्यक रुग्णांकरिता प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा:आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांची माहिती



**मुंबई :** आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यासोबत लाखो वारकरी भाविक येत असतात. त्यांच्या आरोग्यासाठी पालखी मार्गावर तसेच आषाढी यात्रा कालावधीत यावर्षीपासून अत्यावश्यक रुग्णांकरिता नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर यांच्यासह पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक आणि तालुका आरोग्य अधिकारी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, "वारकरी वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सेवा पुरवाव्यात. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. 'आरोग्य संपन्न वारी' व 'वारी सहाय्य' या माध्यमातून पालखी मार्गावर वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असून, यामध्ये प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे."

"वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा पुरवताना कोणतीही उणीव राहू नये. वारी कालावधीत आरोग्य सुविधा देण्यासाठी पंढरपूर येथील स्थानिक डॉक्टरांची उपलब्धता राहण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात. पालखी मार्गावरील तसेच शहरातील खासगी वैद्यकीय रुग्णालयांतील दहा टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार आहेत. खासगी डॉक्टरांना आरोग्य सेवा देण्याचे आवाहन आपण करतो, त्यामुळे सरकारी डॉक्टरांनीही अधिक जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने सेवा द्यावी. वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यात सार्वजनिक आरोग्य विभाग कुठेही कमी पडता कामा नये.", असे त्यांनी सांगितले.

## कर्जमाफीची डेडलाईन संपली; जुलै आला तरी शेतकऱ्यांना लाभ नाही, भरणेंनी सांगितले कारण



**पुणे :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या बहुचर्चित शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीला होत असलेला विलंब आणि त्यातील कथित जाचक अटींवरून सध्या विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे. ३० जून आणि त्यानंतर दिलेली ५ जुलैची मुदत उलटूनही लाभ न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर येथे बोलताना सरकारची नेमकी अडचण आणि भूमिका स्पष्ट केली. "घाईगडबडीत कोणतीही चूक होऊ नये आणि पात्र शेतकऱ्यांनाच लाभ मिळावा, यासाठी प्रशासकीय पातळीवर काळजी घेतली जात असल्याने हा थोडा वेळ लागत आहे," असा खुलासा त्यांनी केला आहे. ते पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे आयोजित एका कार्यक्रमात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

सरकारने सुरुवातीला ३० जूनपर्यंत आणि त्यानंतर ५ जुलै रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल, अशी घोषणा केली होती. मात्र, ही मुदत संपूनही अद्याप प्रत्यक्ष लाभ न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि विरोधकांकडून 'फसवी कर्जमाफी' असल्याचा आरोप होत आहे.

या विलंबाचे कारण स्पष्ट करताना कृषीमंत्री भरणे म्हणाले, "सध्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात कर्जमाफीसाठी आवश्यक असलेल्या पुरवणी मागण्या मंजूर केल्या जातील. त्यानंतर या प्रस्तावावर राज्यपाल महोदयांची लवकरात लवकर स्वाक्षरी होईल. ही प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होताच अवघ्या काही दिवसांत कर्जमाफीची रक्कम थेट माझ्या बळीराजाच्या बँक खात्यात जमा केली जाईल."

विरोधी पक्षांकडून कर्जमाफीच्या जाचक अटींवरून राज्यभरात आंदोलने केली जात आहेत. यावर बोलताना कृषीमंत्र्यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावत सरकारच्या संवेदनशीलतेचे कौतुक केले. "सध्या राज्यात कोणतीही निवडणूक नाही. तरीही अडचणीच्या काळात बळीराजाच्या पाठीशी उभे राहण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाने घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांनी आणि मी स्वतः शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून या नेतृत्वाचे आभार मानतो," असे भरणे म्हणाले.

कर्जमाफीसाठी सुरुवातीला निश्चित केलेल्या तारखांमध्ये काही प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणी आल्या होत्या. मात्र, या सर्व अडचणी आता अंतिम टप्प्यात असून येत्या काही दिवसांतच निधी वितरणाचा मार्ग मोकळा होईल, असे आश्वासन कृषीमंत्र्यांनी इंदापूरकरांना दिले. त्यामुळे आता चालू अधिवेशनानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष रक्कम कधी पडते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

कर्जमाफी फसवी असल्याचा आणि जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना फटका बसत असल्याचा आरोप करत विरोधकांनी अनेक ठिकाणी आंदोलने केली आहेत. यावर उत्तर देताना दत्तात्रय भरणे म्हणाले, "प्रक्रियेला चार-दोन दिवस उशीर झाला आहे, हे मी नक्कीच मान्य करतो. पण कोणतीही त्रुटी राहू नये म्हणूनच आम्ही जाणीवपूर्वक काळजी घेत आहोत. सर्व तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून येत्या काही दिवसांतच माझ्या बळीराजाच्या बँक खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल."

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ जुलै २०२६


## दारावर उभा होता द्वारपाल

द्वारपाल म्हणाला...

दारावर उभा होता एक द्वारपाल.
आत बसलेली होती सत्ता— बुलेटप्रूफ काचांआड,
संवेदनांच्या शवपेटीत.

एक मास्तर आला.
हातात अर्ज नव्हता,
हातात होता फुटलेल्या प्रश्नपत्रिकेचा जळका तुकडा
आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची अजून धुमसणारी राख.

तो म्हणाला—
"साहेबांना भेटायचं आहे...
एका पिढीच्या भविष्याचा खून झालाय."

द्वारपाल हसला...
ते हसू नव्हतं,
लोकशाहीच्या गळ्यावर फिरवलेला एक धारदार सुरा होता.

तो म्हणाला—
"साहेबांना वेळ नाही.
ते सध्या आमदार फोडतायत, खासदार विकत घेतायत,
नगरसेवकांची बोली लावतायत.
लोकशाहीचा लिलाव रंगात आलाय.
देश महासत्ता होतोय म्हणे!"

इकडे प्रश्नपत्रिका फुटते,
तिकडे संविधानाच्या पानांतून रक्त झिरपतंय.
इकडे विद्यार्थी मरतो,
तिकडे मंत्र्यांच्या खुर्च्या जगतात.

रस्त्यावर घामाने भिजलेली लेकरं न्याय मागत उभी आहेत.
त्यांच्या डोळ्यांत उद्याची भाकर आहे.
पण सत्तेच्या ताटात फक्त खुर्च्यांची मेजवानी वाढली आहे.

आत्महत्या केलेल्या त्या मुलांच्या गळफासालाच
राजकारणाने विजयाचा हार समजून मिरवलं,
आणि भाषणांत त्यांना 'दुर्दैवी घटना' म्हणून पुरून टाकलं.

शेतकऱ्याच्या छातीवर कर्जाचा नांगर चालतोय.
जंगलाच्या मुळांवर बुलडोझरची प्रार्थना सुरू आहे.
देवळातील सोन्याला धर्माचं कवच आहे,
पण माणसाच्या पोटात रिकामेपणाचं वादळ आहे.

देशाचा सौदा करणाऱ्यांच्या ओठांवर राष्ट्रवादाचे घोष आहेत,
आणि राष्ट्राच्या लेकरांच्या हातात रिकामे प्रवेशपत्र.

न्याय?
तो फाइलींच्या धुळीत श्वास मोजतोय.

मानवमुक्तीची मूल्यं ग्रंथालयांच्या कपाटांत कैद झाली आहेत,
आणि मनूच्या सावल्या रोज नव्या पहाटेचा गळा दाबत आहेत.

द्वारपाल पुन्हा म्हणाला—

"घरी जा मास्तर...
कविता लिहा.
कारण आता सत्य बोलणं गुन्हा आहे,
प्रश्न विचारणं देशद्रोह आहे,
आणि अन्यायालाच न्याय म्हणण्याची सरकारी भाषा तयार आहे."

मास्तर निघून गेला.
त्याने मागे वळूनही पाहिलं नाही.
कारण शाळेच्या फळ्यावर आज पुन्हा
'उद्या' हा शब्दच पुसला गेला होता.

पण त्याच्या पावलांमागे एक अख्खा वर्ग रडत होता.
त्या रडण्याचा आवाज कधीतरी संसदेच्या भिंती फोडेल.

कारण
राखेतून उठणाऱ्या प्रत्येक पिढीला
एक दिवस स्वप्नांचा सूड घ्यावाच लागतो.

आणि त्या दिवशी
द्वारपालही दार उघडून उभा राहील.
जनतेच्या मुठी कुलूपं नव्हे,
दरवाजेच उखडून टाकतील.

आणि इतिहास पुन्हा एकदा
रक्ताने नव्हे,
सत्याच्या शाईने लिहिला जाईल.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## CSIR JRF-NET परीक्षेत देशात २१ वा क्रमांक ; श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या ओमकार चव्हाणचा गौरव



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील रसायनशास्त्र विभागातील एम.एस्सी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी ओमकार इंद्रजीत चव्हाण याने जून २०२६ मध्ये झालेल्या CSIR JRF-NET परीक्षेत ९९.८७ पर्सेंटाइल गुण मिळवत देशात २१ वा क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.यावेळी माकणीचे प्राचार्य डॉ डी व्ही माने, उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, रसायनशास्त्र विभागप्रमुख व मार्गदर्शक डॉ. पी. ए. पीटले, डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. संजय अस्वले म्हणाले की, महाविद्यालयात नियमित शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा, NET-SET आणि संशोधनाभिमुख मार्गदर्शन दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमितपणे महाविद्यालयात उपस्थित राहून पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यास उज्ज्वल करिअर घडविण्याच्या अनेक संधी उपलब्ध होतात. ओमकार चव्हाण यास Council of Scientific and Industrial Research (CSIR) ची प्रतिष्ठेची Junior Research Fellowship (JRF) मंजूर झाली असून, यामुळे त्याला भारतातील विविध राष्ट्रीय संशोधन प्रयोगशाळांमध्ये उच्च शिक्षण व संशोधन करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच तो सहाय्यक प्राध्यापक पदासाठीही पात्र ठरला आहे. ओमकारच्या या दैदिप्यमान यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष (भैय्या) मोरे, सरचिटणीस जनार्दन साठे, सचिव पद्माकरराव हराळकर, सहसचिव डॉ. सुभाष वाघमोडे तसेच संस्थेच्या संचालक मंडळाने त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ जुलै २०२६


# पेरणीकार ज्ञानेश्वर गायके यांच्या कवितेचा विद्यापीठ अभ्यासक्रमात समावेश



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नडचे सातत्याने लेखन करणारे युवा कवी ज्ञानेश्वर क. गायके यांची कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी. ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासपत्रिका आठवी, सत्र सहावेसाठी 'मराठवाडी कविता' या अभ्यासक्रमात 'मराठवाड्यातील निवडक कवितेमध्ये' 'सिमेंटच्या जंगलात' ही कविता समाविष्ट झाली आहे. ज्ञानेश्वर गायके यांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध असून ते उत्तमपणे लेखन करतात. त्यांच्या या साहित्यसेवेची दखल घेऊन त्यांची कविता अभ्यास मंडळातर्फे निवडण्यात आली आहे. कन्नड तालुक्यासाठी हा नव्या पिढीतील कवींच्या कवितेचा सन्मान आहे. कन्नड साहित्यिकांच्या गावातून समस्त तिफण साहित्य परिवार तसेच मार्गदर्शक डॉ. सर्जेराव जिगे, तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, प्रा.डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा जाधव, डॉ. अंबादास सगट, डॉ. प्रा. प्रतिभा अहिरे, डॉ.संजय गायकवाड तसेच तिफण साहित्य परिवार-अरुण थोरात, सुरेश औटे, जगन्नाथ जाधव, दत्ता मोरस्कर, शिवनाथ गायकवाड, अमोल मोकासे, लक्ष्मण वाल्डे, केशरचंद राठोड, संदीप वाकडे, श्रीराम दाबके, प्रवीण दाभाडे, भिमराव सोनवणे, अविनाश सुसलादे, संदीप कुलकर्णी आदींनी भरभरून शुभेच्छा देऊन त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# अर्थाला अर्थ देणारी स. भु. पतसंस्था - डॉ. बाळकृष्ण क्षीरसागर



**छत्रपती संभाजीनगर :** श्री सरस्वती भुवन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्था ही खऱ्या अर्थाने सातत्याने 'अ' वर्ग राखणारी पतसंस्था आहे. या पतसंस्थेची वाटचाल वाखाणण्याजोगी आहे. असे प्रतिपादन अर्थशास्त्राचे विशेषज्ञ आणि श्री स.भु.शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष बाळकृष्ण क्षीरसागर यांनी केले. पतसंस्थेच्या ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. 'अत्यंत पारदर्शक व्यवहार आणि विश्वास जपणाऱ्या या पतसंस्थेने स्वतःची मोठी पत या क्षेत्रात निर्माण केली असून . या वैभवशाली परंपरेबद्दल पतसंस्थेच्या संचालकांचे अभिनंदन करतो.' असेही ते पुढे म्हणाले. सभासद कुटुंब कल्याण योजनेत ३० हजार रू.वैद्यकीय मदत, सभासदाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास वारसांना ३० लाखांची मोठी मदत अशा पतसंस्थेच्या योजनांचे त्यांनी कौतुक केले. स.भु.शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ सदस्य रमेश रंगनाथराव जोशी, पतसंस्थाध्यक्ष संजय कंटुले, सचिव संजय परदेशी, उपाध्यक्ष प्रशांत अपसिंगेकर, कोषाध्यक्ष धनंजय जोशी आणि सर्व संचालक व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी अहवाल वर्षात पतसंस्थेतून निवृत्त झालेल्या सभासदांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या वार्षिक सभेच्या प्रथम सत्राचे प्रास्ताविक पतसंस्थेचे अध्यक्ष संजय कंटुले यांनी केले. सेवानिवृत्तांच्या सत्काराचे यादीवाचन ॲड. सुधाकर कापरे यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन धनंजय जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन जगदीश निकम यांनी केले. सभेच्या दुसऱ्या सत्रात दिवंगतांना श्रद्धांजली नंतर सचिव संजय परदेशी यांनी वाचन केलेल्या मागील इतिवृत्तास आणि अंदाजपत्रकास सभागृहाने मान्यता दिली. नफा विभागणी आणि ९ टक्के लाभांश वाटप मान्यता, सर्वसाधारण कर्जाचा व्याजदर ९ टक्के वरून ८.५% आणि इतर सर्व प्रकारच्या कर्जाचा व्याजदर अर्धा टक्का कमी करण्यास मान्यता देण्यात आली. पतसंस्थेचे संचालक नीलकंठ देशमुख, डॉ. विनोद सिनकर, पुरुषोत्तम काथार, विजय चापाईतकर, ॲड. सुधाकर कापरे, जगदीश निकम, हेमंत जोशी, वैशाली धामणगावकर, चंद्रकला खोमणे, भगवान सोनवणे, सचिन भुतेकर, व्यवस्थापक श्रीवल्लभ जोशी, लिपिक उमाकांत कुलकर्णी आदींची व्यासपीठावरती उपस्थिती होती. या सर्वसाधारण सभेस बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. राष्ट्रगीताने सर्वसाधारण सभेची सांगता झाली.

## पावसाची करामत

सर पावसाची येता,
झाली हिरवळ धरा.
पक्षी पावशा सांगतो,
शेतामध्ये पेरा करा. १

काळ्या मातीच्या खुशीत
बीज गर्भात निजते
बीज अंकुरास येता
शेत शिवार सजते. २

पावसाची करामत,
बिया अंकुर फुटते.
रिमझिम पावसाने,
झाडी डोंगर नटते. ३

नटलेल्या डोंगरात,
खळखळ वाहे झरा.
झरा कोसळता दरी,
धून वाजवित खरा. ४

पावसाचे येणे जाणे,
पाठशिवणीचा खेळ.
कधी दुःख कधी सुख,
बसे आनंदाचा मेळ. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## नको कंटाळा

लहान मुलांनो
मोठ्यांचे ऐका जरा
कामाचा कंटाळा करणे
प्रकार नाही बरा

सकाळी लवकर उठण्याचा
नको कंटाळा
लगबगीने उठून
गाठा आपली शाळा

आत्मविश्वासाने करा
संकटावर मात
आळसाची सोडा
कायमची साथ

खेळकर असूद्या वृत्ती
पण नको धिंगामस्ती
अंगी असावी सदा
कर्तव्याशी दोस्ती

एकाग्रतेने करा
रोज अभ्यास
पहिला येण्याचा
असावा मनी ध्यास



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ जुलै २०२६


## बँन्डमास्तराची कविता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी):** मराठवाड्याचे प्रसिध्द साहित्यिक तथा बँन्डमास्टर अय्युब पठाण लोहगावकर यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी. ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासपत्रिका आठवी, सत्र सहावे यासाठी " मराठवाडी कविता" या अभ्यासक्रमात मराठवाड्यातील निवडक कवितेमध्ये अय्युब पठाण लोहगावकर यांच्या "मर्मगंध" या कवितासंग्रहातून "गंध फुलांचा" ही आशयघन निसर्ग कविता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात जून 2026 पासून समाविष्ठ करण्यात आली आहे. साहित्यिक तथा बँन्डमास्टर अय्युब पठाण लोहगावकर हे गेल्या चाळीस वर्षापासून मराठी साहित्य क्षेत्रात सातत्याने दर्जेदार व वास्तववादी लेखन करीत असून आजपर्यंत त्यांची दहा कवितासंग्रह, तीन बालकथासंग्रह, व एक ललितलेख संग्रह असे चौदा पुस्तके प्रकाशित आहे. विशेष म्हणजे विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाने महाराष्ट्रातील एका बँन्डमास्तराच्या लेखन साहित्याची दखल घेऊन आणि अभ्यासक्रमात कवितेचा समावेश करून सोनेरी अक्षरांनी प्रथमच विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात इतिहास रचलेला आहे. अय्युब पठाण लोहगावकर हे पैठण तालुक्याचे साहित्यरत्न असून सर्व क्षेत्रातून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

## कन्नड विधानसभा क्षेत्र केंद्र स्तरीय प्रतिनिधी पदी नासेर पटेल



**कन्नड (अरुण थोरात) :** एम आय एम पक्षाचे कन्नड तालुका घाटमाथा अध्यक्ष नासेर पटेल यांची एस आय आर अभियान कन्नड विधानसभा क्षेत्र केंद्र स्तरीय प्रतिनिधी पदी निवड करण्यात आली आहे.माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांचे विश्वासु पदाधिकारी असलेले नासेर पटेल यांनी एम आय एम पक्ष वाढीसाठी मोठे योगदान दिले आहेत. कन्नड विधानसभा क्षेत्रात मतदार नोंदणी व परिक्षण पारदर्शक पणे पार पाठण्यासाठी पक्षाने त्यांच्या वर ही जबाबदारी सोपावली आहे.या निवडी बद्दल त्यांचे पक्ष कार्यकर्ते, मित्रमंडळ यांनी अभिनंदन केले आहे.

## मंदिरातून लुटलेला पैसा सत्ताधाऱ्यांना अन् त्यांच्या मुलाबाळांना पचणार नाही- संजय राऊत



**मुंबई :** मतदारसंघांच्या पुनर्रचना विधेयकासाठी (डिलिमिटेशन बिल) आवश्यक असलेला बहुमताचा आकडा भाजप सरकार कितीही पक्ष आणि खासदार फोडले तरी गोळा करू शकत नाही, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. तसेच, अयोध्येतील राम मंदिराच्या नावावर भाजपच्याच लोकांनी मोठी लूट केली असून, या कथित घोटाळ्याविरोधात आजपासून शिवसेना तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

संजय राऊत म्हणाले की, आम्ही खऱ्या हिंदुत्वासाठी आंदोलन करत असून सत्ताधाऱ्यांनीही यात सामील व्हायला हवे. आम्ही हिंदुत्व सोडले, अशी टीका करणाऱ्यांना राम मंदिरात पडलेला दरोडा दिसत नाही का? अयोध्येत सीतामातेचे मंगळसूत्र चोरले गेले असून, ही चोरी कोणत्याही बाहेरील व्यक्तीने केली नसून, तेथील विश्वस्त आणि भाजपशी संबंधित लोकांनीच केली आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच राम मंदिरातील या कथित लुटीचे नेतृत्व स्वतः पंतप्रधान करत असल्याचा घणाघाती त्यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, सत्ताधाऱ्यांकडे केवळ केंद्रीय तपास यंत्रणा आणि राम मंदिरातून लुटलेला पैसाच आहे. कंत्राटदारांकडून मोठ्या प्रमाणावर देणग्या गोळा करून अयोध्येत कार्यक्रम साजरे करण्यात आले होते. हा पापाचा पैसा कोणालाही पचणार नाही. सध्या अधिवेशन सुरू असून विरोधकांना रोज पक्षबदलासाठी ऑफर्स दिल्या जात असल्याच्या चर्चा आहेत. मात्र, माणसाला किती हव्यास असावा? ज्याला कुठे थांबायचे हे कळत नाही, त्याचा अंत निश्चित असतो, असे सांगत पक्ष फोडणारे हे सरकार लवकरच कोसळेल, असा इशारा त्यांनी दिला.

संजय राऊत म्हणाले की, या पृथ्वीतलावर राम आणि कृष्ण हे आले आणि गेले, महाभारत जिंकल्यानंतर त्यांनाही आपला देह सोडावा लागला. मग मोदी, शहा, फडणवीस किंवा शिंदे हे काय अमर आहेत का? प्रत्येकाला एक दिवस जावेच लागते. सत्ता, पैसा आणि यंत्रणेच्या बळावर आमदार-खासदार आणि कार्यकर्ते फोडण्याचे घाणेरडे राजकारण देशात आणि राज्यात सुरू आहे. आमदारांना तर तब्बल २० कोटींची ऑफर देण्यात आली होती. पैशांच्या आणि सत्तेच्या याच अवाजवी हव्यासापोटी निर्माण झालेल्या तणावामुळे आज सत्ताधाऱ्यांना रुग्णालयात दाखल व्हावे लागत आहे. तर शिंदे आजारी असतील तर त्यांच्या प्रकृतीला नक्कीच आराम पडो. पण त्यांच्या प्रकृतीसोबतच सध्या राजकारणामुळे बिघडलेल्या महाराष्ट्राच्या प्रकृतीलाही आराम मिळणे गरजेचे आहे. माणसाला किती हव्यास असावा याला काही मर्यादा असायला हवी. कुठे थांबायचे हे न कळल्यामुळेच वाढत्या मानसिक तणावाचा सामना करावा लागत असून नेत्यांवर रुग्णालयात भरती होण्याची वेळ येत आहे, असा टोला त्यांनी शिंदेंचा नाव न घेता लगावला आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903